पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७८ ■ रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# महागर्जनेसाठी 'देवेंद्र' येणार अकोल्यात !

**मुख्यमंत्र्यांच्या विजय संकल्प सभेने भाजप प्रचाराचा श्रीगणेशा ▶▶ विविध पक्षांसह अपक्षही प्रचारासाठी सज्ज**

प्रतिनिधी ४ जानेवारी

**अशी आहे निवडणुकीची सद्यस्थिती**

- एकूण प्रभाग- २०
- एकूण जागा- ८०
- एकूण उमेदवार- ४६९
- पक्षांचे उमेदवार- ३६७
- अपक्ष उमेदवार- १०२
- पुरुष उमेदवार- २७०
- महिला उमेदवार- १९९

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध झाली असून अपक्षांना चिन्हही वाटप झाले आहे. त्यामुळे ख-या अर्थाने प्रचाराला शनिवारपासून सुरूवात झाली आहे. सर्वच पक्ष व अपक्ष उमेदवार व कार्यकर्ते सज्ज झाले असून कामाला लागले आहेत. भाजपने आपल्या उमेदवाराच्या प्रचाराचा श्रीगणेशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विजय संकल्प सभेने केला आहे. त्यामुळे मनपा निवडणुकीच्या प्रचाराचा धुराळा उडण्यास सुरूवात झाली आहे.

महानगरपालिका निवडणुकीसाठी शनिवारी राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने अपक्ष उमेदवारांना विविध निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. यासोबतच निवडणुकीच्या रिंगणातील उमेदवारांचे अंतिम चित्र स्पष्ट झाले असून, आता महापालिकेचे मैदान सज्ज झाले आहेत. शनिवारपासून प्रचाराचा - धुरळा उडायला सुरूवात झाली आहे. महापालिका निवडणुकीत विविध राजकीय पक्षांचे ३६७ आणि अपक्ष म्हणून १०२ उमेदवार रिंगणात उभे ठाकले आहेत. या निवडणुकीत महिला राखीव असलेल्या ४० जागांवर १९९ महिला उमेदवार नशीब अजमावत आहेत. तर २७० पुरुष उमेदवार आहेत. हे प्रमाण पाहता एका जागेसाठी सरासरी पाच महिला रिंगणात आहेत. तर सर्वसाधारण असलेल्या जागांवर सरासरी ७ पुरुष उमेदवार आहेत. राजकीय पक्षांच्या जागावाटपाकडे पाहता, भारतीय जनता पक्षाने ६२ जागांवर उमेदवार उभे केले आहेत, तर भाजपने महायुतीतील घटक पक्ष राष्ट्रवादी (अजित पवार) साठी १४ जागा सोडल्या आहेत. शिंदेसेना सर्वाधिक ७२ जागांवर निवडणूक लढवत असून, काँग्रेसने ५५ जागांवर उमेदवार दिले आहेत. त्यामुळे ही निवडणूक चुरसीची होणार असून तिरंगी व चौरंगी लढत पहावयास मिळणार आहे.



अकोल्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विजय संकल्प सभा होणार आहे. मात्र वृत्त लिहिस्तोवर मुख्यमंत्र्यांचे आगमन झाले नव्हते.

### काँग्रेससमोर एमआयएमचे आव्हान

काँग्रेसने राष्ट्रवादी (शरद पवार) ला २४ जागा दिल्या आहेत. उद्धवसेनाही ५५ जागांवर निवडणूक लढवत असून, काही प्रभागांमध्ये आघाडी धर्म पाळत काँग्रेसविरोधात उमेदवार दिलेले नाहीत. त्याचप्रमाणे काँग्रेसनेही काही ठिकाणी उद्धवसेनेविरोधात उमेदवार दिलेले नाहीत. एमआयएम पक्षानेसुद्धा ३७ उमेदवारांना संधी देत, काँग्रेससमोर मतविभाजनाचे आव्हान निर्माण केले आहे.

### भाजप-राष्ट्रवादी वगळता इतर पक्ष स्वतंत्र लढणार

राजकीय समीकरणांचा विचार करता, भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांची युती आहे. तर काँग्रेस, उद्धवसेना, शिंदेसेना, वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम हे पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. निवडणुकीत कोणता पक्ष किती जागांवर मजल मारतो, याचे चित्र निवडणुकीच्या निकालानंतरच स्पष्ट होणार आहेत.

### संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन समितीचे गठन

राज्य निवडणूक आयोगाच्या १५ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार अकोला महानगरपालिका क्षेत्रात तत्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी माध्यमांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने महानगरपालिका स्तरावर प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन समिती गठित करण्यात आली आहे.

### नवीन चेहऱ्याची संख्या अधिक

शहरातील विविध प्रभागांमध्ये तिरंगी आणि चौरंगी लढती पाहायला मिळणार असून, काही ठिकाणी बंडखोर उमेदवार प्रमुख पक्षांसाठी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे आहेत. तरुण उमेदवार, महिला उमेदवार आणि नवख्या चेहऱ्यांची संख्या लक्षणीय असल्याने यावेळी मतदारही नव्या पर्यायांकडे लक्ष देताना दिसत आहेत. त्यामुळे नेमका कौल कुणाच्या बाजूने लागणार, याबाबत सध्या तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

# विमानतळावर तुफानी स्वागत ; भाजपचे शक्तीप्रदर्शन !

प्रतिनिधी ४ जानेवारी



**अमरावती :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अमरावतील रविवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास रोड शोला प्रचंड उपस्थितीत आणि उत्साहात प्रारंभ झाला. यावेळी भाजपाचे उमेदवारांसह पदाधिकारी, कार्यकर्ते व शहरवासी मोठ्या संख्येने या रोड शोमध्ये सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अमरावती विमानतळावर आगमन झाले. त्यांचे राज्यसभा खासदार अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, भाजपाचे शहराध्यक्ष नितीन धांडे, भाजपाचे नेते शेखर भोयर, भाजपाचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, भाजप नेते ॲड. प्रशांत देशपांडे, भाजपाचे नेते जयंत डेहणकर, भाजपचे आमदार प्रताप अडसड, आमदार प्रवीण तायडे, आमदार केवलराम काळे, आमदार उमेश यावलकर , दिनेश सूर्यवंशी यांच्यासह भाजपच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी विमानतळावर स्वागत केले. भाजपाचे ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, भाजपचे दुसरे ग्रामीणचे अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांची प्रामुख्याने उपस्थित होती. त्यानंतर ते रोडशो करिता रवाना झाले.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत सर्वप्रथम प्रचाराचा श्रीगणेशा अमरावतीपासून करण्यात येत असल्याने लोकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. या भव्य रोड शोची सुरूवात रविवार, ४ जानेवारीला सकाळी ११ वाजेच्या सुमारास पंचवटी चौकापासून झाली. तेथून हा रोड शो शेगाव नाका - कॉटन मार्केट – चौधरी चौक - होटेल आदर्श – जयस्तंभ चौक - श्याम चौक- गांधी चौक – शिलांगण रोड असा निघाला होता. यावेळी या रोड शोचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले. विविध घोषणा व जयजयकाराने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून वातावरणात उत्साह संचारला होता. या रोड शोचा समारोप साईनगर येथे करण्यात आला. जवळपास ६-७ किलोमीटरचा हा रोड शो चार मार्गावरून मार्गक्रमण करीत होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शोमुळे भाजपच्या पक्ष कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले होते, असे मत आ. संजय कुटे यांनी व्यक्त केले.भाजप ने शिवासेना आणि युवा स्वाभिमान पक्षासोबत युती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ९ वर्षानंतर मनपाच्या सार्वत्रिक निवडणुका होत असल्याने पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी तयारी करून ठेवली. युतीच्या पक्षाकडे इच्छुक उमेदवारांनी एकच गर्दी केली. अखेरपर्यंत प्रत्येकाचे समाधान होणार नाही, हे लक्षात आल्याने युती होऊ शकली नाही. तरीही आम्ही युवा स्वाभिमान पार्टीला ९ जागा देणार होतो. पैकी ६ जागी उमेदवार दिले नाही. उर्वरित ३ जागी उमेदवार अर्ज परत घेणार होते; परंतु उमेदवारांची तयारी बघता आम्ही अखेर ३ उमेदवारांचा अर्ज परत घेतला नाही. म्हणून भाजप शहरात ६८ जागा लढविणार असल्याचे घोषित केले, असे पक्ष निरीक्षक आ. संजय कुटे यांनी रोड शोच्या पूर्वसंध्येला घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी आ.संजय कुटे यांच्यासह शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे आणि खासदार डॉ. अनिल बोंडे हेही उपस्थित होते.


अमरावतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो होणार असून पंचवटी चौकात मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी सज्ज असलेले भाजपा पदाधिकारी.

# ठाकरेंच्या विरोधात गुजराती-हिंदी भाषिक एकवटले !

वृत्तसंस्था ४ जानेवारी

**मराठी मतदारांमध्ये मोठी फूट**

**मुंबई :** महापालिकेच्या मतदानासाठी १० दिवस शिल्लक आहेत. ठाकरे बंधू विरुद्ध भाजप-एकनाथ शिदें अशी लढत होत असताना काँग्रेस-वंचितची आघाडी देखील मैदानात उतरली आहे. त्यामुळे मुंबईकर कोणाला पसंती देणार याचा पहिला सर्व्हे समोर आला आहे.

असेंडिया कंपनीने केलेल्या सर्व्हेच्या आकडेवारीने कही खूश कही गम अशी स्थिती दिसून येत आहे. असेंडियाच्या सर्व्हेमध्ये कुठल्या समाजात कोणत्या पक्षाला किती पाठींबा आहे याची आकडेवारी दिली आहे.

या आकडेवारीनुसार मराठी भाषिक मतदारांध्ये ठाकरे बंधूंच्या युती ही शिंदे-भाजपच्या युतीच्या पुढे आहे. मराठी भाषिक ४२ टक्के मतदारांनी शिंदे-भाजप युतीला पाठींबा दिला आहे. तर, उद्धव-राज ठाकरे यांच्या युतीला ४४ टक्के मतदारांनी पाठींबा दिला आहे. त्यामुळे मराठी मतदारांमध्ये ठाकरे बंधू अवघ्या दोन टक्क्यांनी पुढे आहे.

### हिंदी-गुजराती भाषिक मतदार

मराठी मतदारांमध्ये फूट पडत त्यांची मते ठाकरे बंधू आणि भाजप-शिदेंमध्ये विभागली असताना इतर भाषिक मते मात्र शिंदे-भाजपच्या मागे ठामपणे उभी राहिलेली दिसत आहेत. हिंदी, गुजराती आणि इतर भाषिक ५३ टक्के मतदारांनी भाजप-शिंदे यांच्या युतीला पाठींबा दिला आहे. तर, ठाकरे बंधूंना केवळ १५ टक्के इतर भाषिक मतदारांचा पाठींबा आहे. काँग्रेसला देखील १९ टक्के इतर भाषिक मतदारांचा पाठींबा आहे.

### मुस्लिम मतदार कोणासोबत?

मुस्लिम मतदार ठाकरे बंधूंसोबत जातील, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, सर्व्हेच्या आकडेवारीनुसार ठाकरे बंधूंना मोठा झटका बसताना दिसत आहे. या आकडेवारीनुसार तब्बल ४१ मुस्लिम मतदारांनी काँग्रेस वंचितच्या आघाडीला पाठींबा दिला आहे. तर, ठाकरे बंधूंच्या युतीला २८ टक्के मुस्लिम मतदारांचा पाठींबा आहे.

# शहरात धडधडणार दोन मुलुख मैदानी तोफा

प्रतिनिधी ४ जानेवारी

**अकोला:** महापालिका निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अकोल्यात येत आहे. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी फडणवीस येत आहे. क्रिकेट क्लबवर ही सभा असून दूसरीकडे एम आय एम नेता ओवेसी यांची सभा होते की नाही या बाबत सांशकता आहे.

महापालिकेच्या निवडणुकीची रंगत वाढत चालली आहे आज शहरात भाजपाची मुलुख मैदानी तोफ़ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा अकोला क्रिकेट क्लब मैदानावर दुपारी २ वाजता होत आहे. तर दुसरीकडे एम आय एम चे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच खासदार असदुद्दीन ओवेसी यांची सभा संध्याकाळी सात वाजता गडंकी परिसरातील पोलीस प्रशिक्षण महाविद्यालया जवळील झुल्फिकार मैदानात होणार आहे. या दोन्ही सभांना घेऊन मतदारांमध्ये मोठा उत्साह पाहावयास मिळत आहे. या दोन्ही सभा आपल्या पक्षांचा माहोल तयार करण्यासाठी तसेच स्थानिक मुद्दे विकास

### एक सभा होणार दुसऱ्या सभेबाबत प्रश्नचिन्हं

कार्य आणि महापालिका संबंधित अन्य प्रश्नांवर आपले मुद्दे मांडण्यासाठी होत आहेत. जिथे मुख्यमंत्री भाजपासाठी सभा घेत आहेत त्या सभेसाठी अगोदर सर्व परवानगी घेण्यात आली आहे तर दुसरीकडे ज्या जुल्फीकार मैदानात एम आय एम चे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांची सभा होत आहे. या सभेसाठी अद्यापही परवानगी न घेतल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे ही सभा होणार की नाही याबद्दल मतदारांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. एम आय एम च्या अकोल्यातील नेत्यांचा समन्वय नसल्याचे चित्र असून त्यांनी कुठलीही माहिती दिली नाही. हे दोन्ही नेते आपल्या ओजस्वी वाणीसाठी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे या दोघांची जुगलबंदी पहायची संधी शहरातील मतदारांना चालून आली.परंतु ओवेसींच्या सभेसाठी बातमी लिहीस्तोवर परवानगी मिळाल्याची नसल्याची माहिती असल्याने ही सभा होणार की नाही याबद्दल साक्षंकता निर्माण झाली आहे.

# अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळसह १३ कार्यालये कंपन्यांच्या घशात

प्रतिनिधी ४ जानेवारी

### 'महावितरण'चे खासगीकरण; कामगार संघटना झाल्या आक्रमक

**कोल्हापूर :** महावितरण कंपनीच्या राज्यातील अकोला, वाशिम, बुलडाणा, यवतमाळसह १३ मंडळ कार्यालयांचे खासगीकरण होणार असून, कार्यालये खासगी कंपन्यांच्या घशात घातली जाणार आहेत. महावितरणने १५ डिसेंबर रोजी निर्णय घेतला आहे. यामुळे कामगार संघटना आक्रमक झाल्या असून, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकल वर्कर्स फेडरेशनने याला तीव्र विरोध केला आहे. जालना, छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामीण, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव व बीड शहरांतील कार्यालयांचा यामध्ये समावेश आहे. ऑक्टोबर महिन्यात झालेल्या संपावेळी खासगीकरण होणार नाही, असे पत्र दिले. गतवर्षी संपाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत महावितरणचे कोणत्याही प्रकारचे खासगीकरण होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. एवढा सारा प्रकार होऊनही सरकारने महावितरणच्या १३ मंडळ कार्यालयांचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेतल्याने कामगार संघटनांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.






सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि.४ जानेवारी २०२६






पटसंख्येचे कारण
शाळा बंदचे धोरण
गरिबांचे मरण
अन् खाजगीकरण

# नवीन शैक्षणिक धोरणाचे तंत्र- मंत्र

# खाजगी करणाचे षडयंत्र !

## *१० पट संख्या असलेल्या शाळा होणार बंद * गरीबांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा छंद

## *गुणवत्ता पुर्ण शिक्षण व कायद्याची अंमलबजावणी करा - शिक्षण बचाव समन्वय समिती

● सिटी न्युज ब्युरो वाशीम ●

नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार जिल्ह्यात १० पट संख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात आता शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरविले जात आहेत. नविन शिक्षक भर्ती तर होणारच नाही. तर गरिबांना हक्काच्या शिक्षणापासुन वंचित राहावे लागणार आहे. शासनाचे हे नविन शैक्षणिक धोरणाचे तंत्र-मंत्र अन शाळा बंद करुन खाजगी करण करण्याचे षडयंत्र सुरु आहे. हे सर्व गरिबांच्या शैक्षणिक मुळावर असुन शैक्षाणिक खाजगी करणाच्याउद्देशाने होत असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे शाळा वाचवण्यासाठी अनेक सामाजिक व राजकिय संघटना रस्त्यावर उतरुन आंदोलन करणार आहेत. आता यासाठी राज्यस्तरीय शाळा बचाव परिषद स्थापन झाली होती. आता पुन्हा शिक्षण बचाव समन्वय समिती आक्रमक झाली असून शाळा वाचविण्यासाठी लढा देणार आहे. तर १० पट संख्या असलेल्या ५१ शाळा वाचविणार असून त्यासाठी शिक्षकांनाही सोबत घेणार असल्याचे समन्वय समितीचे अध्यक्ष गजानन धामणे यांनी सांगितले.



राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०) हे सामान्य गरीब आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी हिताच्या विरोधात आहे. या शिक्षण धोरणाचे भीषण परिणाम जनतेसमोर येत आहेत. अगोदर राज्यातील २० पटसंख्येपेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या १५ हजार शाळा बंद करुन ५० हजार शिक्षक अतिरिक्त ठरवले जाणार होते. यामुळे राज्यातील सुमारे दोन लाख विद्यार्थी शिक्षण प्रवाहातुन बाहेर फेकले जाणार होते. मात्र, शाळा बचाव समितीच्या वतीने वाशीम येथे राज्यस्तरीय परिषद घेतली. शाळा वाचविण्यासाठी सर्व समविचारी संघटनांच्या राज्यव्यापी एकजुट केली. त्यामुळे शासनाने खाजगी करणाचा व शाळा बंदचा निर्णय लांबणीवर टाकला. आता पुन्हा १० पेक्षा कमी पट संख्या असलेल्या शाळा बंदची तयारी सुरू केली असून या संबंधिच्या बैठकाही घेणे शासकीय स्तरावर सुरू आहेत. दिवसेंदिवस शिक्षणाचे खाजगीकरण करुन शिक्षण ही खरेदी- विक्रीची वस्तु बनवली जात आहे. ज्यांच्याकडे पैसा त्याला शिक्षण आणि ज्यांच्याकडे पैसा नाही त्याला शिक्षणही नाही हे आजच्या शिक्षण व्यवस्थेचे सुत्र बनले आहे. पुर्वी गुलाम असल्यामुळे शिक्षण नाकारले गेले होते आणि आजच्या आधुनिक युगात शिक्षण महाग करुन बहुजनातील गरीब जातींना आणि वर्गांना गुलामीत ढकलण्याचे कारस्थान बेमालुमपणे नव्हे राजरोसपणे सुरू आहे. यासाठी खुद्द शासन व्यवस्थेचाच आधार घेतला जात आहे.

जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या बहुतांश शाळांची अवस्था आज बकाल झाली आहे. शिक्षण क्षेत्राची कधी नव्हे इतकी वाईट अवस्था झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संघटनांच्या वतीने बंद करण्यात येणाऱ्या शाळा वाचवण्यासाठी राज्यस्तरीय शाळा बचाव परिषद घेण्याबाबत पुढाकार घेतला आहे. शिक्षण बचाव समन्वय समितीचे डॉ. रामकृष्ण कालापाड, प्रा. डॉ. अनिल राठोड, डॉ. रवी जाधव, इंजि. सिताराम वाशिमकर, पी. एस. खंदारे, दिनकरराव बोडखे, गजानन धामणे, राजू कोंघे, मिलिंद सुर्वे, सौ. रंजनाताई पारीस्कर, मधुकर जुमडे, विजय झुंजारे, डॉ. गजानन बाजड, जगदेव राऊत, श्याम खिल्लारे आदींची उपस्थिती होती.

## 'सिटी न्युज सुपरफास्ट'चा ६८ वृत्तातून सहभाग

शाळा बचाव आंदोलनात विविध सामाजिक संघटनांसोबत सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्टने उडी घेतली होती. आंदोलनाच्या विविध प्रकारच्या ६८ बातम्यांची वृत्तमालिका लावून धरली. शाळा बचाव आंदोलनात थेट उडी घेतली. शासनाचे भ्रष्ट धोरण, पटसंख्येचे कारण, गरीबांचे मरण, अन् खासगी करण या माध्यमातून जनजागृती केली. आंदोलनात थेट सहभाग घेतल्यामुळे राज्यस्तरीय परिषदेच्या दिवशी सुपरफास्ट वृत्तांकन अंक परिषदेमध्ये झळकविला. व परिषदेच्या वेळी सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्त मालिकेची चर्चा रंगली होती.

## वाशीमध्ये झाली होती राज्यस्तरीय शाळा बचाव परिषद...

सर्वांना मोफत, सत्तीचे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे आणि राज्यातील कुठलीही शाळा पटसंख्येअभावी बंद करण्यात येऊ नये यासाठी राज्यभरातील विविध शिक्षक संघटनांच्या माध्यमातून आणि शिक्षण बचाव समन्वय समिती महाराष्ट्र च्या वतीने रविवारी दि. ८ जानेवारी २०२३ रोजी स्थानिक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय , एस एम सी परिसर येथे राज्यस्तरीय शाळा बचाव परिषद ३ सत्रात पार पडली होती. तिनही सत्रांच्या मान्यवरांनी गरीबांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा व खासगीकरणाचा आरोप केला होता. त्यानंतर शाळा बचावसाठी विविध ठराव घेवून सर्व संघटना एकत्र येवून वज्रमुठ बांधली. व राज्यस्तरीय परिषदेचा समारोप केला. त्यानंतर शासनाने जि.प. शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घेतला. या परिषदेसाठी राज्यभरातील शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.




## थोडक्यात

### य.च.महाविद्यालयात क्रांतीसूर्य सावित्रीबाई फुले जयंती संपन्न



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

श्री. मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात दि.०३ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे क्रांतीसुर्य सावित्रीबाई फुले जयंती दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. नम्रता धनजकर यांनी केले. या कार्यक्रमाला रासेयो. कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

### वाढा फॉर्म येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरा लगत असलेल्या वाढा फार्म येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे दिनांक ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक किशोर सुर्वे , शिक्षिका मनीषा नालींदे व अंगणवाडी सेविका दीपा इंगोले, महिला आशा वर्कर काजल अजय भगत उपस्थित होत्या. पोलीस पाटील विनोद मनवर यांनी अध्यक्षस्थान भूषविले पण त्यांनी शिक्षणाचा दिवा विझू दिला नाही. ताई, तुझं शिक्षण म्हणजे तुझी ताकद आहे.उठ... शिक... आणि स्वतःचं आयुष्य उजळून टाक कारण तू 'मुलगी' आहेस म्हणून नाही, तर तू 'शक्ती' आहेस म्हणून ! अशा शब्दात पोलीस पाटील विनोद मनवर यांनी मार्गदर्शन केले.

## बालविवाहमुक्त आणि लिंगसमतामूलक महाराष्ट्रासाठी निर्धार करुया - कुंभेजकर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

लिंग गुणोत्तर हे समाजाच्या संवेदनशीलतेचे व प्रगतीचे महत्त्वाचे द्योतक आहे. मुलींचा जन्म, शिक्षण, आरोग्य आणि सन्मान याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्याशिवाय लिंग गुणोत्तरात अपेक्षित वाढ होणार नाही. त्यामुळे बेटी बचाव बेटी पढाव अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाने व समाजाने मुलींच्या संरक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा. बालविवाह, लिंगभेद व भेदभावाच्या मानसिकतेला आळा घालून मुलींना समान संधी देणे ही काळाची गरज आहे. प्रशासनासोबतच नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेऊन लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

या प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे



सचिव व्ही.एस. चौखंडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षाधीन अधिकारी गणेश ठाकरे व गजानन पडघान, निती आयोगाच्या जिल्हा प्रकल्प प्रमुख श्रीमती निलिमा भोंगाडे , जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले, डेमो? स्वप्नील चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## घोटा येथे जि.प.शाळेत बालआनंद मेळावा

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील घोटा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटा येथे ३ जानेवारी रोजी आयोजित केलेला खाद्य महोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला आहे.

येथील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थाची खरेदी पालकासह या महाउत्सवासाठी आमंत्रित केलेल्या पाहुण्यांनी केली असून याचा आस्वादही घेतला आहे. विद्यार्थ्यांना खऱ्या कमाईचा मार्ग कळावा या मागचा उद्देश आहे. यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांचे पालक, व सरपंच अनिल मोरे, तसेच उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, मुख्याध्यापक सुधीर सरकटे सर, शिक्षक कैलास





हेंबाडे, शिक्षक तानाजी बिल्लारी, किशोर मोरे, डॉ.गजानन मोरे, सुनिल मोरे, संदिप मोरे ग्रा.प.सदस्य, अंबादास कांबळे ग्रा.प.सदस्य, रामेश्वर बेंद्रे उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती घोटा, निलेश मोरे, गजानन अवचार, अमोल देशमुख, संदीप अवचार, वसंतराव मोरे, ओम लोखंडे, सुभाष वाघमारे, व तसेच सर्व शिक्षक रुंद व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भानुदास मोरे, व शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष व सर्व सदस्य, पोलीस पाटील, पालक व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यांच्यासह शिक्षक कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थाचे स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉल मार्फत विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, भेळ, लाडू चिवडा, वडे, मिसळ, पोहे, पोगे, अशी विविध खाद्यपदार्थाची विक्री केली.

## ज्येष्ठ पत्रकार गजानन बानोरे यांना दर्पण जीवन गौरव पुरस्कार

### साई नगरीत ६ जानेवारीला होणार वितरण सोहळा

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आणि आधुनिक पत्रकारितेचे पितामह, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा दर्पण जीवन गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार गजानन बानोरे यांचे नाव जाहीर झाले आहे. सदर पुरस्काराची घोषणा पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी केली असून ६ जानेवारी रोजी साई नगरी शिर्डी येथे दिमाखदार सोहळ्यात पत्रकार बानोरे यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकारदिनाच्या औचित्यावर हा पुरस्कार सोहळा पार पडत असल्याने या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील प्रतिभावान मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. राज्यभरातील पत्रकार, लेखक आणि माहिती अधिकाऱ्यांची उपस्थिती लाभणार असल्याने हा वितरण सोहळा माध्यम क्षेत्रातील मानाचा उत्सव ठरणार आहे.



रिसोड येथील ज्येष्ठ पत्रकार गजानन बानोरे हे विधायक पत्रकारितेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून संपूर्ण जिल्ह्यात सुपरिचित आहेत. पत्रकाराला आवश्यक असणारी चौकस वृत्ती, नाविन्याचा सतत शोध आणि घटनेचा अचूक वेध घेत वृत्तांकन करणे ही त्यांच्या पत्रकारितेची विशेषतः आहे. जवळपास तीन दशकांपासून प्रामाणिकता, पारदर्शकता आणि सत्यासाठी निडरपणे वृत्तांकन करत त्यांनी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची गरिमा कायम जोपासली आहे. अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी आपल्या लेखणीला तलवारीची ताकद देत, पत्रकार गजानन श्रीराम बानोरे यांनी समाजाला दिशा देण्याचे कार्य अव्याहतपणे केले आहे आणि आजही करत आहेत. एका आघाडीच्या दैनिकात काम करत असताना आपल्या शहरातील स्थानिक समस्यांना अधिकाधिक वाचा फोडण्यासाठी त्यांनी स्वतःचे पिंगळाक्षी एक्सप्रेस वृत्तपत्र सुरू केले आहे. पत्रकारितेचे व्रत सांभाळतांना त्यांनी स्थितप्रज्ञ, ध्येयवादी, समन्वयवादी आणि एक अजातशत्रू पत्रकार म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शैक्षणिक कार्यातून सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक कार्य अखंडपणे सुरू ठेवले आहे. त्यांच्या या महान कार्याची योग्य दखल घेत त्यांना दर्पण जीवन गौरव पुरस्कार देण्यात येत असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. मराठी वृत्तपत्राचे जनक अद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा स्मृतिदिन म्हणून ६ जानेवारी हा 'पत्रकार दिन' दरवर्षी साजरा करण्यात येतो. आणि या दिवसाचे आणखी विशेष महत्त्व म्हणजे बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केले होते. अशा अतिविशेष दिवसाच्या शुभपर्वावर रिसोड येथील पत्रकार गजानन श्रीराम बानोरे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

## पिंप्री अवगण येथील परमहंस झोलेबाबा विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य सुनिल सपकाळ हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते कुलकर्णी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुषार शिंगणे सर यांनी केले. प्रास्ताविक संतोष वानखडे सर यांनी केले.

कार्यक्रमात वर्ग नववीच्या मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील गीत सादर केले. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील आणि तसेच विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमामध्ये भाग घेऊन सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रातील अनेक प्रेरक प्रसंग विद्यार्थ्यांना सांगितले.



याप्रसंगी काही विद्यार्थीनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा सादर केली. या कार्यक्रमास श्री.राठोड गोगे गोरवे भुसारी कुलकर्णी सी.एम. वानखेडे , अवगण , गोपाळ , संतोष वानखेडे , लांभाडे आदी मान्यवर शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी दीक्षित सर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, व यशस्वीपणे पार पडला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ४ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## पांदण रस्ता अतिक्रमणामुळे बंद शेतकऱ्याच्या कामकाजावर परिणाम

प्रतिनिधी ४ जानेवारी

**महागाव** : तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या खेडी (वनोली) येथे असलेल्या गाव पांदण रस्त्यावर एका व्यक्तीने अतिक्रमण केल्यामुळे गेल्या काही दिवसा पासून पांदण रस्ता बंद झाल्या मुळे शेतकऱ्यांना व मुक्या जनावरांना शेतात जाण्यासाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे अतिक्रमण झाल्याची तक्रार उपविभागीय महसूल अधिकारी सखाराम मुळे यांना देण्यात आली होती परंतु या तक्रारी वर अजून पर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने अतिक्रमणित झालेला पांदन रस्ता कधी खुला होणार याकडे खेडी (वनोली) येथील शेतकऱ्यां सह नागरिकांचे लक्ष लागले आहे

महागाव तालुक्यातील खेडी (वनोली) हे गाव शेवटच्या टोकावर आहे जंगलात वसलेल्या या गावाच्या आजूबाजूने माळरानाचे साम्राज्य आहे त्यामुळे येथील शेतकऱ्यासह नागरिकाकडे मोठ्या प्रमाणावर दूध भक्ती जनावरे आहेत.

# सावित्रीबाई फुले यांचा पुतळा हटविल्याने वाद





प्रतिनिधी ४ जानेवारी

**यवतमाळ** : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला स्टेट बँक चौकात उभारण्यात आलेला पुतळा नगरपालिकेने व शहर पोलिसांनी संयुक्त कारवाईत हटविल्याने तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेविरोधात शनिवारी (ता. ३) नागरिक, सामाजिक संघटना व महिलांनी एकत्र येत निषेध व्यक्त केला असून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत पुतळा तातडीने 'जैसे थे' बसविण्याची मागणी केली आहे.

नागरिकांच्या मागणीनुसार स्टेट बँक चौकात सावित्रीबाई फुले यांचा पुतळा बसविण्याबाबत यापूर्वीच संबंधित विभागांकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने २७ ऑगस्ट २०१९ रोजी तर तत्कालीन जिल्हा पोलिस अधीक्षक व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी २० सप्टेंबर २०१९ रोजी 'ना हरकत' दिली होती. तरीदेखील नगरपालिका प्रशासनाने त्या ठिकाणी पुतळ्याचे काम प्रत्यक्षात सुरू केले नव्हते. जयंतीचे औचित्य साधून नागरिकांनी शुक्रवारी (ता. २) सकाळीच चौथरा बांधून नियोजित ठिकाणी पुतळा उभारला. मात्र, विनापरवानगी पुतळा उभारल्याचा दावा करत नगरपालिका प्रशासनाने रात्री उशिरा पोलिस बंदोबस्तात पुतळा हटविला. या कारवाईमुळे सामाजिक संघटना व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली.

शनिवारी सकाळी महात्मा फुले चौकात जयंती कार्यक्रम पार पडल्यानंतर संतप्त नागरिकांनी थेट स्टेट बँक चौक गाठत सावित्रीबाई फुले यांचा मोठा कटआऊट लावून अभिवादन केले.

पालिका व पोलिस प्रशासनाच्या भूमिकेविरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदविण्यात आला. त्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून पुतळा पुन्हा उभारण्याची मागणी केली.

### हटविलेल्या जागी प्रतिमेचे पूजन; आंदोलनाचा इशारा



■ रविवारी सावित्रीबाई फुले यांच्या पुतळा समितीच्या सदस्यांसह 'सावित्रीच्या लेकींनी' हटविण्यात आलेल्या जागी पुन्हा सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा ठेवून विधिवत पूजन केले. पुतळा पुन्हा त्या ठिकाणी बसविण्यात आला नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. पुतळा हटविताना कोणतीही लेखी परवानगी दाखविण्यात आली नसल्याचा आरोपही आंदोलकांनी केला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून प्रशासन पुढे काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## घरकुलासह विकासकामांतील गैरव्यवहाराची चौकशी करा

### अन्यथा उपोषण; संयुक्त पत्रकार संघाचा इशारा

प्रतिनिधी ४ जानेवारी

**उमरखेड** : तालुक्यातील धानोरा (सा.) येथे प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल), स्मशानभूमीकडे जाणारा सीसी रोड पोहोच रस्ता तसेच सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा संयुक्त पत्रकार संघ, उमरखेड यांनी दिला आहे.

धानोरा (सा.) येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रत्यक्ष गरजू लाभार्थ्यांना लाभ न देता काही मर्जीतील व्यक्तींना हाताशी धरून संबंधित अधिकारी, कर्मचारी व ग्रामसेवक यांनी कोणतेही घरकुल बांधकाम न झालेल्या लाभार्थ्यांना पहिला व दुसरा हप्ता अदा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच गावातून स्मशानभूमीकडे जाणारा पोहोच रस्ता केवळ कागदोपत्री दाखविण्यात आला असून प्रत्यक्षात सीसी रोड मंजूर असतानाही काम करण्यात आलेले नाही.

याशिवाय सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम हे सरपंच व ग्रामसेविका स्वतः करत असून, इस्टिमेटमधील मापन व दर्जानुसार काम न करता अत्यंत निकृष्ट व घाईघाईत (थातूरमातूर) काम सुरू असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. शासनाकडून गोरगरीब जनतेसाठी येणाऱ्या निधीचा मोठ्या प्रमाणावर अपहार होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या बाबत सामान्य नागरिकांनी विचारणा केल्यास ग्रामसेविका त्यांच्या मर्जीतील व्यक्तींमार्फत धमक्या देत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी व आर.ई. यांची संगनमताने शासन निधीचा गैरवापर झाल्याने सर्वांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या आशयाचे निवेदन जिल्हा परिषद यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले असून, तात्काळ चौकशी करून कारवाई न झाल्यास संयुक्त पत्रकार संघ, उमरखेड यांच्या वतीने उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## टी.जी.देशमुख आश्रमशाळेत आनंद मेळावा

प्रतिनिधी ४ जानेवारी

**महागाव** : नूतन वर्षाचे स्वागत तसेच विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने येथील टी. जी. देशमुख माध्यमिक आश्रम शाळा, आमनी बु. येथे स्काऊट-गाईड पथकाच्या वतीने भव्य आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ चविष्ट खाद्यपदार्थांची रेलचेल उभी केली नाही, तर उद्योजकतेचे व व्यवहारज्ञानाचे धडेही आत्मसात केले.

### विद्यार्थ्यांनी जपली उद्योजकतेची जोपासना



आनंद मेळाव्याचे उद्घाटन प्रियदर्शनी शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती वनमालाताई राठोड व कोषाध्यक्ष, माजी सभापती सुनीलभाऊ राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी श्रीमती वनमालाताई राठोड यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व उपक्रमशीलतेचे कौतुक केले. तर सुनीलभाऊ राठोड यांनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांनी जीवनात स्वावलंबी बनावे, असा संदेश दिला. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स उभारले होते. घरगुती चवीचे व पौष्टिक पदार्थ तयार करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. इतर विद्यार्थ्यांनी या पदार्थांचा मनमुराद आस्वाद घेत मेळाव्याचा आनंद लुटला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारज्ञान, संवादकौशल्य व संघभावना वृद्धिंगत झाली.

कार्यक्रमाला माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक जयकुमार वानखेडे, प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक कावडे सर, रुपेश देशमुख सर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. स्काऊट-गाईडच्या शिस्तबद्ध आयोजनामुळे व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या उपक्रमाची परिसरात विशेष चर्चा होत आहे.

## माणुसकीची भिंतकडून सावित्रीबाई फुले जयंती



प्रतिनिधी ४ जानेवारी

**पुसद** : माणुसकीची भिंत पुसदच्या महिला सदस्या गेल्या आठ वर्षांपासून थोर समाजसुधारक महिलांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सामाजिक उपक्रम राबवत आहेत.

भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका व क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ३ जानेवारी रोजी माणुसकीची भिंत महिला सदस्यांच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, पुसद येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना जेवण, फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. तसेच गरजवंत महिलांना साड्या व लुगडे देण्यात आले. याप्रसंगी उपस्थित महिलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श घेण्याचे आवाहन करण्यात आले.

